# बैठकीचे इतिवृत्त (Minutes of Meeting)

Tender No १९६६

**कंत्राटी कर्मचारी सेवा बाहयस्त्रोतामार्फत (शस्त्रक्रियागृह सहाय्यक -१५, जमादार -२, स्वयंपाकी - ५, न्हावी - २, कक्षसेवक - १७०, सफाईगार - १३०, सुरक्षारक्षक - ४५ ) पुरविण्याबाबत (एकूण ३६९ पदे )**

सदर ई-निविदेच्या अनुषंगाने दिनांक १२/०३/२०१८ रोजी निविदा पूर्वक बैठक घेण्यात आली. त्याबैठकीत निविदाधारक / कंत्राटदाराने खालील प्रमाणे प्रश्न उपस्थित केलेत, त्याअनुषंगाने समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**१) निविदेची किंमत/ रक्कम कमी करण्यात यावी :-**

सदर निविदा ही एक कोटी रक्कमपेक्षा जास्तीची असल्याने महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/उद्योग-४ दिनांक ३०/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये निविदेची रक्कम ठरविण्याचा अधिकार हा संस्थेला आहे. त्याअन्वये सदर निविदेची किंमत / रक्कम कमी करण्यात येऊन ती रुपये ५०,०००/- ठेवण्यास समितीने मान्य केलेली आहे.

**२) प्रत्येक मनुष्य पुरवठाधारकाचे वेगवेगळी निविदा काढण्यात यावी :-**

महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निण्रय क्रमांक पदनि २४१६/ प्र.क्र. २०३/१६/वैसेवा-१ दिनांक ०९/०२/२०१६ अन्वये शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय चंद्रपूर करीता बाह्यस्त्रोताने भरण्याकरीता वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे मंजूर आहे. त्यामुळे एकुण वर्ग-४ च्या पदाची निविदा काढण्यात आलेली आहे. प्रत्येक मनुष्यपूरवठाधारकाचे वेग-वेगळी निविदा काढणे शक्य नाही असे समितीने ठरविले.

**३) निविदेतील बँक सॉलव्हन्सी कमी करण्यात यावी.**

सदर निविदेतील बँक सॉलव्हन्सी कमी करण्याचा निर्णय समितीने मान्य केलेला असून ती तीन कोटी ऐवजी रुपये एक (१) कोटी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे लहान-मोठे सर्वच कंत्राटदार / निविदाधारकाला सदर निविदेमध्ये भाग घेणे शक्य होईल.

**४) प्रपत्र ४ मध्ये सुधारणा करण्यात यावी.**

काही कंटारदारानी प्रपत्र ४ मध्ये (Price Bid) मध्ये त्रृटी असल्याचे निदर्शनास आणून दिल्याने प्रपत्र -४ मध्ये सुधारणा करण्यात आलेली असून, प्रस्तूत सुधारणा शुध्दीपत्रकात नमुद करण्याचे समितीने ठरविले आहे.

**५) मुदत वाढ :-**

सदर निविदेमध्ये अंशत: बदल करण्यात आलेला असल्याने सदर निविदेला १५ (पंधरा) दिवसांची मुदत वाढ देण्यास समितीने मान्य केलेली आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
चंद्रपूर